# कौटुंबिक हिंसेपासून स्त्रियांचे संरक्षण कायदा – २००५

# कलम १२ अंतर्गत न्यायाधिशांकडे करावयाचा अर्ज

प्रति,
मा. न्यायाधीश प्रथम श्रेणी
यांचे न्यायालयात

कौटुंबिक हिंसेपासून स्त्रियांचे संरक्षण कायदा – २००५, कलम १२ अन्वये कलम अर्ज

१. कौटुंबिक हिंसेपासून स्त्रियांचे संरक्षण कायदा – २००५,कलम १२ अन्वये अर्ज दाखल केला आहे. सोबत कौटुंबिक घटना अहवाल जोडला आहे.

२. मा. न्यायाधीश महोदयांना विनंती की, कौटुंबिक घटना अहवाला मधील तपशीलांची दखल घेउन पुढील आदेश पारीत करण्यात यावेत.

   a. कलम १८ अन्वये संरक्षण आदेश
      i. कौटुंबिक घटना अहवालातील तपशिलांनुसार व तत्सम हिंसक घटना घडू नयेत यासाठीचा जाब देणाराला मनाई हुकूम
      ii. अर्जदाराच्या कामाचे ठिकाणी प्रवेश करण्यास जाब देणाराला मनाई
      iii. मुलांची शाळा-महाविद्यालयामध्ये, ट्युशन किंवा खेळाचे मैदान वगैरे ठिकाणी प्रवेश करण्यास मनाई
      iv. अर्जदाराशी कोणत्याही प्रकारे संपर्क साधण्यास मनाई
      v. मुलांनी शाळेत जाण्यास किंवा अर्जदाराला घराबाहेर पडण्यास जाब देणाराने विरोध करण्यास मनाई
      vi. कोणत्याही प्रकारच्या संपत्तीतून अर्जदारास व मुलांस बेदखल करण्यास मनाई

vii. सामायिक नावावर असलेल्या बँक खाते किंवा लॉकरसंदर्भात व्यवहार करण्यास मनाई, सदर खाते, लॉकरसंदर्भात व्यवहार सुरू ठेवण्यास अर्जदारास परवानगी

viii. अर्जदाराचे नातेवाईक, तिच्यावर अवलंबुन असलेल्या व्यक्ती, तसेच तिच्याशी संबंधीत इतर कोणत्याही व्यक्तिंवर होऊ शकणा-या संभाव्य हिंसेला प्रतिबंध घालण्याच्या दृष्टीने त्या व्यक्तिंपासून दूर रहाण्याचा जाबदेणारास आदेश.

ix. इतर आवश्यक ते आदेश

b. कलम १९ अन्वये निवासाचा आदेश

i. एकत्रित किंवा सामायिक घरातून अर्जदारास बाहेर काढण्यास, हाकलून देण्यास जाबदेणारास मनाई,

ii. अर्जदार रहात असलेल्या घरात किंवा घराच्या ठरावीक भागत प्रवेश करण्यास अर्जदारास परवानगी

iii. त्या घरासंदर्भात अर्जदाराचे हक्क तिच्यापासून हिरावून घेण्यास, त्या घरांसदर्भातील हक्कांतून तिला बेदखल करण्यास, ते घर किंवा इतर संपत्तीसंदर्भात व्यवहार करून त्यावर कोणत्याही प्रकारचा बोजा चढविण्यासजाबदेणारास मनाई

iv. सामाईक घरात प्रवेश व सर्व सेवांचा वापर करण्याची अर्जदारास परवानगी

v. सामायिक घरातून स्वतः निघून जाण्याचे आदेश किंवा अर्जदाराची, मुलांची इतरत्र राहण्याची सध्याच्या घराप्रमाणेच सोय करण्याचा जाब देणारास आदेश

vi. इतर आवश्यक ते आदेश

c. कलम २० अन्वये आर्थिक सहाय्याचा आदेश

i. अन्न, कपडे, औषधोपचार व इतर प्राथमिक गरजेच्या वस्तू.

ii. शाळेची फी व अनुशंगिक खर्च.

iii. घरखर्च.

iv. इतर आवश्यक ते आदेश.

d. कलम २१ अन्वये मुलांच्या ताब्यासंदर्भातील आदेश

i. मुलांचा ताबा अर्जदाराकडे देण्याचा जाब देणारास आदेश

ii. मुलांचा ताबा अर्जदाराच्या वतीने इतर व्यक्तिना देण्याचा आदेश

e. कलम २२ अन्वये नुकसान भरपाई मिळणेबाबत आदेश
    i. अर्जदाराच्या नोकरी-व्यवसायातील एकंदर उत्पन्नाचे नुकसान
    ii. वैद्यकीय खर्च
    iii. जाब देणाराने हिरावून घेतलेल्या चीजवस्तू, गरजेच्या वस्तू, त्यांची झालेली तोडफोड वगैरे नुकसान
    iv. इतर काही प्रकारची झालेली शारीरिक अथवा मानसिक दुखापतीसंदर्भात नुकसानभरपाई
    v. नुकसान भरपाईची एकूण रक्कम (वरील सर्व नुकसानभरपाईची रक्कम)
    vi. इतर आवश्यक ते आदेश

f. वरीलपैकी तातडीने व एकर्फी मिळण्याचे आदेश

३. सदर अर्जाबरोबर इतर न्यायालयांमध्ये प्रलंबित प्रकरणांची माहिती –
    a. भारतीय दंड संहिता कलम- - - अंतर्गत दाखल प्रकरणे व त्याचा निकाल झाला असल्यास त्याचा तपशील
    b. भारततीय फौजदारी प्रक्रिया संहिता कलम - - - अंतर्गत दाखल प्रकरणे व त्याचा निकाल झाला असल्यास त्याचा तपशील
    c. हिंदु विवाह कायदा १९५६ अंतर्गत प्रकरण
    d. हिंदु दत्तक आणि पोटगी कायदा १९५६ अंतर्गत दाखल प्रकरण व त्याचा निकाल झाला असल्यास त्याचा तपशील
    e. पोटगी मंजूर झाली असल्यास
        i. अंतरीम पोटगी दरमहा रक्कम
        ii. एकूम पोटगीची मिळालेली रक्कम
    f. जाब देणारास न्यायालयीन कोठडीत पाठविण्यात आले होते का? असल्यास किती ? दिवस/आठवडे/महिने
    g. इतर आवश्यक ते आदेश

- मे. न्यायालयास विनंती की मागणी केल्यानुसारचे योग्य ते सहाय्य मंजूर व्हावे,
- नमूद वस्तुस्थितीनुसार आवश्यक ते इतर आदेश व्हावेत,

दिनांक
स्थळ

अर्जदार

अर्जदाराचे वकील

व्हेरीफिकेशन

मी, - - - - - - - - - - - - - , वय- वर्षे, व्यवसाय – नोकरी,रा. - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - ता. - - - - - - , जि. - - - - - - - , सदरील अर्जदार, कथन करते की, वरील अर्जामधील सर्व मजकूर माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर असून त्याच्या सत्यतेसाठी मी आज दि. - - - - - - - - रोजी - - - - - - येथे माझी सही केली आहे.

स्थळ

दिनांक अर्जदार